स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी ('विद्यावाचस्पती') या पदव्युत्तर पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन – आराखडा.

प्रबंधशीर्षक

'मराठी लोकसाहित्यातील निवडक लोककलांचा चिकित्सक अभ्यास'
(लावणी,तमाशा व गोंधळ)

संशोधक

प्रविण शंकर सोलनकर
एम.ए.एम.एड्.मराठी नेट, एम.एस.डब्ल्यू.
एन.161 शास्त्रीनगर, येरवडा, पुणे.

*** मार्गदर्शक ***

प्रा.डॉ. राजीव वैजेनाथराव यशवंते.
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख
श्री. गुरू बुध्दिस्वामी महाविद्यालय,
पुर्णा (ज.) जि. परभणी .

***संशोधन केंद्र ***

भाषा, साहित्य व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
जुलै – २०१९

प्रास्ताविक:-

प्रस्तुत विषयासाठी निवडलेल्या लोकसाहित्यातील निवडक लोककलेचे महत्त्व विशद करून चिकित्सक पध्दतीने संशोधन करणार आहे. तशा प्रकारे संपूर्ण प्रकरणाची रूपरेषा ठरवलीआहे.

समाज आपल्या रोजच्या जीवनात परंपरा,रूढी,परंपरा, प्रथा आणि रितीरिवाज यांच्यावर अवलंबून असतो, कीर्तन,पोतराज गिते, भोंडला,तमाशा,मदारी, गारूडी, भारूड, पथनाटये,गवळणी,पिंगळा, दशावतार,जानपद गिते, विधीनाटये,भक्तिगीते,गोंधळ,लावणी अशा अनेक प्रकारच्या लोककला महाराष्ट्रात पहाण्यास मिळतात. या लोककला लोकांनी मौखिक पध्दतीने तयार केलेल्या आहेत. त्या कोठेही लिहून ठेवल्या जात नाहीत, लोकांनी लोकांच्यामनोरंजनासाठी निर्माण केलेल्या आहेत. त्यांचा कोणी एक निर्माता नसतो म्हणून त्यांना लोककला असे म्हणतात.

लोककलांच्या निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेताना आपणास मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाचा मागोवा घ्यावा लागतो. लोकसाहित्याच्या मुळाशी लोकसंस्कृती असते. दृक-श्राव्य रूपातील लोकविष्कारांना आपण लोककला असे मानतो. या लोककला समाज प्रिय होत्या आज त्या लुप्त होत चालल्या आहेत. त्याची कारणे शोधणे क्रम प्राप्त वाटते.

१) संशोधन विषयाच्या निवडी सबंधीची भुमिका:-

महाराष्ट्र विविधतेने नटलेले सांस्कृतिक कृषी प्रधान राज्य आहे, राज्यात विविध लोककलांचा विकास इतर राज्यांच्या तुलनेत अधिक झालेला आहे. कलांचा विकास होत असताना त्या कलांचे संवर्धन आणि जागतिक पातळीवर पोहचविण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न झाले नाहीत. हे वास्तव नाकारता येणार नाही.

लोककला समाजाचे मनोरंजनासाठी लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेल्या आहेत. काळाच्या ओघा बरोबर लोककला बदलत आहेत. काही लोककला लोप पावत चालल्या आहेत. या लोककलांना जिवंतपणा देण्यासाठी मराठी लोकसाहित्यातील लावणी, तमाशा व गोंधळ यांचा अभ्यास करणे मला आवश्यक वाटते.

२) विषयाचे महत्व आणि आवश्यकताः-

आजवर केलेल्या संशोधनांचा आढावा घेतल्यास संशोधनाचे आणि संशोधकांचे प्रमाण अल्प प्रमाणात दिसून येते, तसेच त्यांनी केलेले संशोधनानुसार काही प्रमाणात या लोककलांना परत महत्वप्राप्त झाले आहे. काळा बरोबर लोकांचे राहणीमान बदलत गेले, त्यानुसार त्यांच्या गरजा,करमणुकीची साधने बदलत गेली. लोककला हया मानवी जीवनावर आधारित असतात. त्यांचा परिणाम समाज मनावर होत असतो. कीर्तनातून अध्यात्मिक स्वरूपाचे ज्ञान मिळते. लावणी ही शेतात काम करत असताना विरंगुळा म्हणून म्हटली जात होती परंतु आता ती लोकप्रिय झाल्यामुळे तिचा बोल-बाला आज सर्वांच्या मनावर झालेला आहे. तमाशा हा नाटयेविष्कार आहे.तो प्रत्येक व्यक्तिला आवडतो. तमाशाची संहिता ही मौखिक असते.

आजच्या युगात वरील लोककलांचा प्रभाव कमी होत चालला आहे. लोककलांमधून ग्रामीण जीवनातील प्रसंग चालीरिती, रीवाज,सत्य घटना दाखवले जात असे. या लोककलांचा प्रभाव कमी होण्यामागची कारणे शोधणे मला गरजेची वाटतात.त्यामुळे संशोधन करणे गरजेचे आहे. या उद्देशाने हा संबंधित विषय संशोधनासाठी घेतला आहे. मौखिक परंपरेला ग्रांथिक स्वरूप देणे, उपेक्षित कलांचे दुःख दैन्य, सामाजिक स्थिती समाजासमोर मांडणे, या उद्देशाने संशोधन करण्यासाठी विषयाची निवड केली आहे.

३) संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादाः-

लोककलांची निवड करतानाही त्यास मर्यादा घातलेल्या आहेत. लोककलांमध्ये भारूड, शाहीरी, लावणी, तमाशा, कीर्तन, वासुदेव,गोंधळ,भराडी,दशावतार, भूत्या, लावणी अशा अनेक लोककलांपैकी काही निवडक लोककलांचा अभ्यास करण्यात आला आहे.

१) प्रस्तुत संशोधन हे केवळ महाराष्ट्रातील लोकसाहित्यातील निवडक लोककलां पुरते मर्यादित आहे
२) प्रस्तुत संशोधनात काही निवडक लोककलांचा परामर्ष घेतलेला आहे.
३) लावणी, तमाशा व गोंधळ यांचा अभ्यास विषय आहे.
४) लावणी, लावणीचे प्रकार, लावणीकार यांचा अभ्यास करताना काही सामाजिक मर्यादा येतात.
५) तमाशा उगम, विकास, स्वरूप,प्रकार यांचा अभ्यास करताना भौगोलिक परिस्थितीचा अढसर येतो.
६) गोंधळ हा म्हत्वाचा लोककला प्रकार आहे. याचा अभ्यास करणे सुध्दा क्रमप्राप्त ठरते.

४) संशोधन विषयाची गृहितके:-

१) संस्कृती जतन करण्यास लोककला महत्त्वाची ठरली आहे.

२) लोककलेमुळे सामाजिक प्रबोधन झाले आहे.

३) महाराष्ट्रातील लोककलांची निर्मिती कशी झाली याचे संशोधन.

४) निवडक लोककलांची निर्मितीचा शोध घेणे.

५) लावणीची उत्पती, लावणीकार, लावणीचे प्रकार,व्यथा यांचा शोध घेणे.

६) तमाशा रंगभूमीचा इतिहास, विकास आणि -हास होण्याची कारणे यांचे संशोधन केले

७) गोंधळ ही लोककला ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर राज्य करत असून याचे संशोधन केले.

५) संशोधन पध्दती:-

प्रस्तुत संशोधन हे विषय कालमर्यादित असल्याने निवडक लोककलांचा सूक्ष्म अध्ययनाद्वारे अवलोकन होण्यासाठी विश्लेषण करून संशोधन करताना आस्वादात्मक पध्दती, वर्णानात्मक पध्दती, मनोविश्लेषणपर आकलन पध्दती आणि संशोधनासाठी गरजेच्या ठरणा-या इतर अभ्यास पध्दतीचा वापर करण्यात येईल.

६) संशोधन सामुग्री:-

प्रस्तुत संशोधनासाठी आधारभूत संदर्भग्रंथ ढेरे रा.चि. – लोकसाहित्य शोध आणि समिक्षा, मोरजे गंगाधर – मराठी लावणी वाङ् मय, गायकवाड मिरदेव – मराठी लावणी निर्मिती स्वरूप,जाधव सुदाम – नोकनाटय स्वरूप, शिंदे विश्वनाथ – पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाटय, डॉ. रूस्तुम अचलखांब – मराठी रंगभूमीचे प्रारंभ पर्व, मांडे प्रभाकर – लोकरंगभूमी, आणि कलाकारांच्या मुलाखती,मासिके, इंटरनेटवरील माहिती इत्यादींचा संशोधनससामुग्री म्हणून अनेक संदर्भ ग्रंथाचा उपयोग करण्यात येणार आहे.

७) नमुना निवडः-

महाराष्ट्रात अनेक प्रकारच्या लोककला आहेत, त्यापैकी मी संशोधनासाठी नमुना म्हणून लावणी,तमाशा व गोंधळ या लोककला निवडल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी नॉन पॅरोमेट्रीक पध्दतीने निवड केली आहे. या मध्ये काही कलावंताच्या मुलाखती घेतल्या आहेत.

*** प्रस्तुत संशोधन विषयायाचा आराखडा पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे. ***

अ) लोकसाहित्यातील लोककलांचे स्वरूप व परंपरा

ब) लावणी

क) तमाशा

ड) गोंधळ

प्रकरण पहिले

लोकसाहित्यातील लोककला

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने सदरहू शोध प्रबंधात संशोधनाचा हेतू स्फ्ट केला आहे. महाराष्ट्रात अनेक जाती, धर्माचे लोक गुण्या गोविंदाने एकत्र रहात आहेत. त्यांचे रितीरिवाज वेगवेगळे आहेत. त्याच प्रमाणे लोककला ही वेगवेगळया आहेत. कीर्तन, तमाशा, खडीगंमत, पोतराजगीते,भारूडे, लावणी, अभंग, दशावतार,विधीनाटये, भक्तिगीते,शाहिरी, वासुदेव, पिगंळा, कडकलक्ष्मी, नंदीबैलवाला, पथनाटये, विविध लोकनृत्ये, जानपद गीते, आदिवासी नृत्ये, यासारखे अनेक लोककला आहेत.

लोकसाहित्य म्हणजे काय लोककला का निर्माण झाल्या, उगम, विकास तर काही कला हया लुप्त होत चालल्या आहेत. त्यापैकी काही लोककलांचा चिकित्सक अभ्यास अधिकाधिक वास्तवादी व काटेकोरपणे व्हावे त्यासाठी मनः पुर्वक प्रयत्न करणार आहे.

प्रकरण दुसरे

लावणी

लावणीला प्रारंभी सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. म्हणून ती जशी हिरमुसली होऊन साहित्य प्रकारांतुन नष्ट झाली नाही. तशी लोकशाहीत लोकनाटय या नावाने राजमान्य झाली, तरी अभिजात काव्यांच्या पगंतीला बसू शकली नाही. आजपर्यंत लावणी वाङ्मयाचा जो अभ्यास झाला तो लावणीची व्युत्पत्ती ठरविणे, तिच्यातून दिसणारे सामाजिक चित्र शोधणे,तिच्यातील धार्मिक विचार व तत्वज्ञानांचा शोध घेणे गरजेचे आहे.

लावणीतील अश्लीलता व बीभत्सपणा दाखवून वाङ्मयीन मूल्यमापन करणे, अशा स्वरूपाचा आहे. अर्थात लावणीच्या संदर्भात आजपर्यंत झालेल्या अभ्यासाचे महत्व अत्यंत मोलाचे आहे यात शंका नाही.

लावणीच्या अभ्यासकांनी आपल्या चिकित्सक दृष्टिकोनातून लावणी लोक साहित्याच्या अभ्यासाच्या नवीन दिशाही सूचित केल्या. त्यामुळे लावणी लोकप्रिय झाली, काही काळानंतर तिला परत मरगळ निर्माण झाली त्यामुळे लावणी लोककलेचा पुनःश्च स्वतंत्रपणे विचार करण्याची आवश्यकता वाटत आहे.

१) लावणीचे स्वरूप
२) लावणीच्या व्याख्या व उत्पत्ती
३) लावणीचे प्रकार
४) लावणी कलावंत
५) लावणीचे महत्व
६) निष्कर्ष
७) संदर्भ

<u>प्रकरण तिसरे</u>

तमाशा

तमाशा ही महाराष्ट्राची अतिशय लोकप्रिय लोककला आसून महाराष्ट्रातील लोककलांची ओळखच तमाशाद्वारे झालेली आहे. तमाशा ही जरी निखळ रंजनपर लोककला असली तरी तमाशाचे मूळ हे कलगी- तु-याच्या आध्यात्मिक शाहिरीमध्ये असते. तमाशा हा शब्द फारशीतून उर्दूत आला आणि उर्दूतून मराठीमध्ये स्थिरावला. तमाशा लोकपरंपरेतील विधीनाटयातून घडत गेला. त्यात अश्लीलता, सामाजिक घडामोडी, मराठी हिंदी गाणी यांचा वापर करत असे.

तमाशाची संहिता अलिखित असल्यामुळे सहभागी कलावंताना फक्त पात्र समजून सागितली जातात. तमाशात संहिता कलावंतावर अवलंबून असते कलावंत संहितेला जोडून किती स्थनिक विषयावर संवादाद्वारे अविष्कार करतो याला महत्व असते. तमाशा लोकधर्मी असून नाटयविष्कार असल्यामुळे कथानकाला प्रवाहीपणा आणण्यासाठी तमाशात कथानकातपदयाचा वापर केला जातो. खेडयात आज सुध्दा तमाशा मोठया प्रमाणावर चालतात. तरी पण काही प्रमाणात त्यांचे महत्व कमी होत चाले आहे.

१) तमाशाची संहिता
२) तमाशातील पात्ररचना
३) तमाशातील वाद्ये
४) तमाशातील विनोद आणि समाज जीवन
५) तमाशाची आजची परिस्थिती
६) तमासगीर कलाकारांच्या मुलाखती
७) निष्कर्ष

प्रकरण चौथे

गोंधळ

गोंधळ हा लोककला प्रकार हा देवीच्या उपासनेचा लौकिक पातळीवरचा सारदीकरणात्मक विधी आहे. महाराष्ट्रात गोंधळाला कुळाचाराची प्रतिष्ठा आहे. देवी कृपेसाठी सर्वांगीण शरण जाऊन आपले सर्वांचे मंगल व्हावे, म्हणून केलेल्या विनवणीचा श्रध्दापूर्वक आविष्कार असतो.

मनोरंजन, प्रबांधन, जागृती, करणारा कलाविरूकार म्हणूनही याकडे पाहिले जाते. कुलाचाराच्या प्रथमस्थानी गाकंधळमांडला जातो. गोंधळ हा कुलाचार नृत्य, गीत, गायन, वादन आणि संगीत यांचरूा सुंदरमिलाफातुन तयार झालेला लोकरंजनपर नाटयविधी होय. गोंधळी समाजातील लोकच ही लोककला सादर करतात. गोंधळाला विशेष महत्त्व आहे. गोंधळ आणि गोंधळी प्राचीन काळापासून लोककला प्रकारात मोडली गेलेली आहे. विशेषत या देवींच्या संदर्भात गोंधळ घालण्याची पिढीजात परंपरा आहे.

कालांतराने अन्या देवींच्या बाबतीतही गोंधळ घालण्याची प्रथा सुरू झाली. आज संपूर्ण महाराष्ट्रात देवीच्या नावाने गोंधळ घातला जातो. प्रत्यकाने लग्न विधी पूर्ण झालेनंतर आपल्या घरी जागरण गोंधळ कार्यक्रम असतोच.

१) गोंधळाचे स्वरूप
२) गोंधळाचे प्रकार
३) गोंधळाचे सादरीकरण
४) गोंधळातील वेशभूषा
५) गोंधळातील स्त्री पात्र
६) गोंधळयाची मुलाखत
७) निष्कर्ष

*** निवडक आधारभूत संदर्भ ग्रंथाची सूची***

१) प्रभाकर मांडे:- लोकरंगभूमी–गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद

२) प्रभाकर मांडे:- लोकसाहित्याचे अंत:प्रवाह – गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद

३) धोंडीराम वाडकर:- गोंधळयाचे लोकसाहित्य – स्वरूप प्रकाशन, पुणे

४) रामचंद्र देखणे:- गोंधळ परंपरा, स्वरूप आणि आविष्कार – पद्मगंगा प्रकाशन,पुणे

५) रा.चि. ढेरे:- लोकसंस्कृतीचे उपासक - पद्मगंगा प्रकाशन,पुणे

६) विश्वनाथ शिंदे:- लोकसाहित्य मीमांसा – स्नेहवर्धन प्रकाशनख, पुणे

७) विश्वनाथ शिंदे:- पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिकवगनाटय- प्रतिमा प्रकाशन, पुणे

८) सुदामा जाधव:- लोकनाटय स्वरूप – सुलभा प्रकाशन, औरंगाबाद

९) रूस्तुम अचलखांब:- मराठी रंगभूमीचे अंत:प्रवाह– गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद

१०) रामचंद्र देखणे:- महाराष्ट्राची सांस्कृतीक लोककला – पद्मगंगा प्रकाशन, पुणे

११) पंढरीनाथ धनाजी कांबळे:- मराठी तमाशा आणि वाटचाल – पुणे विद्यापिठाला सादर केलेला अप्रकाशित प्रबंध

१२) इंटरनेटवरील माहिती,विविध मासिके,दैनिक वार्तापत्रे आणि इतर माध्यमे

१३) विविध लोककलाकारांच्यामुलाखती

(टीप:- प्रस्तुत संशोधनाच्या रूपरेषेमध्ये संशोधनात थोडाफार बदल होण्याची शक्यता आहे.)

संशोधक
प्रविण शंकर सोलनकर
एम.ए.एम.एड्. मराठी नेट एम.एस.डब्ल्यू.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.राजीव वैजेनाथराव यशवंते
मराठी विभाग प्रमुख
श्री. गुरू बुध्दिस्वामी महाविद्यालय,पुर्णा